महाराष्ट्र शासन

# मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प

(जागतिक बँक सहाय्यित उपक्रम)

जावक क्र. मरावम/स्मार्ट/प्रशिक्षण/४६/२०२३

दि.०५.०४.२०२३

प्रति,
जिल्हा अंमलबजावणी कक्ष,
स्मार्ट प्रकल्प,
भंडारा, बुलढाणा, नंदुरबार, धुळे, जळगांव, नाशिक.

**विषय :-** स्मार्ट प्रकल्पा अंतर्गत **"गोदाम बांधणी व व्यवस्थापन"** प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उपस्थितीबाबत.

महोदय,

महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचा मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पामध्ये सहभाग आहे. सदर प्रकल्पांतर्गत वखार महामंडळामार्फत CBO's, FPO, व FPC संचालकांसाठी "गोदाम बांधणी व व्यवस्थापन" या विषयावरील निवासी प्रशिक्षण कार्यक्रम **वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंध संस्थान, पुणे** येथे दि.१७.०४.२०२३ ते दि.२०.०४.२०२३ पर्यत आयोजित करण्यात आला आहे. सदरचा प्रशिक्षण कार्यक्रम हा निशुल्क असून फक्त प्रशिक्षण कार्यक्रमासाठी येणे - जाणेसाठीचा खर्च प्रशिक्षणांर्थीनी स्वखर्चाने करावयाचा आहे.

सदरचे प्रशिक्षण महत्वाचे असून यासाठी प्रशिक्षणार्थीनी पुर्ण क्षमतेने व पुर्णवेळ उपस्थित राहणे बंधणकारक आहे. तरी CBO's, FPO, व FPC यांच्या प्रशिक्षणार्थीना दि. १७.०४.२०२३ ते दि.२०.०४.२०२३ पर्यत प्रशिक्षण कार्यक्रमास हजर राहणेबाबत आपले स्तरावरून कळविण्यात यावे. तसेच उपस्थित राहणाऱ्या प्रशिक्षणार्थीची नांवे या कार्यालयास दि.११.०४.२०२३ पर्यत smart.nodal@mswc.in या मेल आडीवर कळविण्यात यावी व ज्या CBO's, FPO, व FPC प्रशिक्षण कार्यक्रमास उपस्थित राहणार नाहीत त्यांना गोदाम बांधणीसाठीचा हप्ता वितरीत करण्यात येणार नाही. तसेच प्रती प्रशिक्षणार्थी केला जाणारा खर्च संबंधित शेतकरी उत्पादक कंपनी कडून वसूल करण्यात येईल. सोबत CBO's, FPO, व FPC यांची यादी जोडण्यात आली आहे.

**सोबत:- वरीलप्रमाणे**

**नोडल अधिकारी,**
**पीआययु, म.रा.व.म, स्मार्ट.**

प्रत :- मा.अतिरिक्त प्रकल्प संचालक,स्मार्ट प्रकल्प पुणे यांना माहीतीसाठी सविनय सादर.

**प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, म.रा.वखार महामंडळ, 583/ब, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे** - 411 037 **(महाराष्ट्र)**
**दूरभाष :** ०२० २४२०६८००/४७ **वेबसाईट** : www.smart-mh.org **ई मेल:** smart.nodal@mswc.in